१०) सदर जागेवर शैक्षणीक प्रयोजनाकरिता मंजुर संस्थेने शिक्षण विभागाची मान्यता मिळवावी या अटीवरच सदर संस्थेस जागा मंजुर करण्यात येत आहे.

११) मंजुर केलेल्या क्षेत्राच्या किमान १०% क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे बंधनकारक राहील.

१२) प्रश्नाधिन जागेवर अनधिकृतपणे कोणत्याही प्रकारे बदल किंवा बांधकाम पैसा मिळविण्याच्या हेतुने केल्यास सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ६७ मधील तरतुदी नुसार बिनशेती आकारास पात्र राहील. तसेच कलम ४५ नुसार येणाऱ्या दंडनीय रक्कम भरणेस सदर संस्था पात्र व जबाबदार राहील. तसेच सदर रक्कम जमीन महसूलाची वसुली म्हणुन वसुल करण्यात येईल.

१३) सदर जमीनीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाची कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी भावी काळात शासनास आवश्यकता असेल तर ती जमीन परत घेण्यास येणार असेल त्या जमीनीसहीत अगर त्या जमीनीच्या कोणत्याही भागासहीत जमीन घेणाऱ्याने दिलेल्या जमीनीच्या किंमती एवढी भरपाई दिल्या नंतर आणि जमीनीवर कोणतेही बांधकाम असल्यास म. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निर्धारित केलेल्या इमारतीचा किंवा बांधकामाचा खर्च दिल्यानंतर शासनाकडेस परत घेणेत येईल.

१४) जमीनीवरील सर्व खाणी व खनीज पदार्थ तसेच दगड पाणी या वरील शासनाने राखुन ठेवलेल्या अधिकाराचा अधिन राहुन जमीन देण्यात येईल आणि शासनास खाणकाम व जमीनीवरील द्रव्ये शोधण्याचा प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल १९६६ मधील तरतुदी नुसार त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपुर्ण स्वातंत्र्य असेल.

१५) प्रश्नाधिन जमीन ज्या कारणाकरिता उक्त संस्थेस दिली आहे त्या संस्थेने सदर जमीनीचा विकास व इतर आवश्यक सोयी स्वत:चे खर्चाने करुन घ्याव्यात.

१६) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम १९७१ चे नियम ६ चे लगत नमूद केलेल्या फॉर्म नं. १ मध्ये भोगाधिकार मुल्यरहित व सारा माफीने दिलेल्या जमीनी बाबत उपरोक्त शैक्षणिक संस्थेने या आदेशाचे तारखेपासुन २ महिन्याचे आंत कबुलायत करुन घ्यावी. तसेच क्रिडांगणासाठी नाममात्र रु १/- वर दिलेल्या जमीनी बाबत कबुलायत फॉर्म नं. २ मध्ये २ महिन्याचे आंत करुन घ्यावी.

१७) जमीनीचे संरक्षण व देखभाल करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. जमीन मंजुरीचा अटीचा भंग केल्यास कोणत्याही मोबदला न देता सरकार जमा करणेस पात्र ठरेल.

१८) जागा वितरणामुळे परिसरातील लोकांच्या व वहीवाटीस व इतर नैसर्गिक हक्कास बाधा पोहचणार नाही याची जबाबदारी संस्थेची राहील.

१९) वरील पैकी कोणत्याही एका शर्तीचा भंग सदर संस्थेने केल्यास संस्थेस कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

(स्वाक्षरीत/-)
(सौरभ राव)
जिल्हाधिकारी नंदुरबार

स्थळ प्रतीवर
जिल्हाधिकारी नंदुरबार यांची सही असे }

प्रत :- म. प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार यांना माहितीसाठी रवाना.

प्रत :- म. कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग ज-६ मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडेस माहितीसाठी सादर.

प्रत :- म. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सादर.

प्रत :- म. उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- म. तहसिलदार नवापूर यांचेकडेस माहितीसाठी पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी मुळ संचिका पानांक १ ते १२५ सह रवाना.

प्रत :- म. तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, नवापूर यांचेकडेस पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

जिल्हाधिकारी नंदुरबार करिता

-145

**वाचले** :- १) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील ज्ञापन क्र.मशा / कार्या / जमीन-६ / ८७२ / २०१० दिनांक १८.०१.२०१०
२) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम ६ व ७
३) म. प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, अक्कलकुवा यांचा दिनांक २२.०९.२००८ चे पत्र

---

क्रमांक/ब/कक्ष-२/गांवठाण/कावि/ ८० /२०१०
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
नंदुरबार, दिनांक :- १८/०२/२०१०

## आदेश

मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील ज्ञापन क्र. मशा / कार्या / जमीन-६ / ८७२ / २०१० दिनांक १८.०१.२०१० अन्वये जवाहर नवोदय समिती या संस्थेस महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम ६ व ७ तसेच शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्रमांक क्रमांक एलआरएफ-१०९२/७११३४/प्र.क्र.३४७८/ग-६ दिनांक ८.२.१९८३ मधील तरतुदीनुसार मौजे श्रावणी ता. नवापूर जिल्हा नंदुरबार येथील ग.नं. ८ क्षेत्र ४.३८ हे.आर. पैकी ३.९५ हे.आर. हे क्रिडांगणसाठी व ग.नं. ९ क्षेत्र ९.३८ हे.आर. पैकी ७.८० हे.आर. इमारत या प्रयोजनासाठी भोगाधिकार मूल्य रहित व महसूल मुक्त रितीने मंजुर करण्यास उपरोक्त शासन परिपत्रक दिनांक ८.२.१९८३ मधील संबधीत अटी नेहमीच्या अटी / शर्तीवर मा. विभागीय आयुक्त नाशिक यांनी मंजुरी दिले वरुन मी जिल्हाधिकारी नंदुरबार जवाहर नवोदय विद्यालय समिती, नवी दिल्ली यांना सदर जमीन या आदेशाद्वारे भोगाधिकार मुल्य रहित व सारा माफीने खालील अटी / शर्तीवर मंजुर करीत आहे.

तसेच मौजे श्रावणी ग.नं. ८ पैकी ३.९५ हे.आर. जमीन महाराष्ट जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ७ मधील तरतुदीनुसार प्रतिवर्षी नाममात्र १/- (एकं) रु भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने दिनांक ८.२.१९८३ च्या परिच्छेद ११ मधील अटी / शर्तीवर क्रिडागणसाठी मंजुर करीत आहे.

➢ **अटी / शर्ती** :-

१) संस्थेने जागेचा फक्त मंजूर प्रयोजनासाठी वापर करावा.
२) संस्था मंजूर जमिन वर्ग-२ भोगवटदार म्हणुन अहस्तांतरणीय शर्तीवर धारण करील.
३) मंजुर जमिनीचे कोणत्याही कारणास्तव वाणिज्यिक वापर अथवा हस्तांतरण तारण / गहाण करता येणार नाही. मंजुर जमिनीपैकी काही क्षेत्राचा अधिक लाभदायी प्रयोजनासाठी वापर करावयाचा झाल्यास शासनाची पुर्व मंजरी घेणे आवश्यक आहे.
४) संस्थेला ज्या प्रयोजनासाठी जागा मंजूर करण्यात येत आहे ती मान्यताप्राप्त असल्याबाबत तसेच संस्था तिचा प्रकल्प पुर्ण करण्यास आर्थिदृष्टया सक्षम आहे याची खातरजमा करण्यात यावी.
५) संस्थेस जागेची आवश्यकता नसल्यास सदर जमीन महसूल विभागास बिनशर्त परत केली पाहिजे.
६) प्रश्नाधिन जागेचा उपयोग ज्या प्रयोजनार्थ जागा मंजुर करण्यात आली आहे त्या करिताच केला पाहिजे. तसेच सदर जागेवर या आदेशाचे तारखेपासुन २ वर्षाच्या आंत बांधकाम पुर्ण करावे व पुर्णपणे याच कामासाठी जागेचा वापर झाला पाहिजे.
७) सदर जागेवर करावयाचे बांधकामाचे आराखडे स्थानिक स्वराज्य संस्था / जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडुन रिबन डेव्हलपमेंट रुल्स प्रमाणे मंजुर करुन घ्यावे व त्याप्रमाणे बांधकाम करावे. मंजुर आराखडया व्यतिरिक्त जादा बांधकाम किंवा बांधकामात बदल अनुज्ञेय राहणार नाही.
८) सदर जमीन किंवा त्या जमिनीचा कोणताही भाग किंवा त्यावरील इमारत यांचा उपयोग मंजुर केलेल्या कारणासाठीच करावा. त्याखेरीज इतर कारणाकरिता हंगामी अथवा कायमचा उपयोग करावयाचा असल्यास त्यासाठी शासनाची आगाऊ परवानगी घेणे बंधनकारक राहील तशी परवानगी न घेता प्रश्नाधिन जमिनीचा दुसऱ्या कारणासाठी वापर होत असल्याचे आढळुन आल्यास सदर जमीनी बाबत शासनाचे आदेशाचे योग्य ती कार्यवाही करणेस पात्र राहील.
९) सदर संस्थेमार्फत चालविण्यांत येणाऱ्या शाळा सर्व जाती, धर्म, पंथाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी खुल्या राहतील.

1633

२०.२

दि. २२/२/०१०

९५